भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# कैदी (न्यायालयातील उपस्थिती) अधिनियम, १९५५

**(सन १९५५ चा अधिनियम क्रमांक ३२)**

[ ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान ]

# The Prisoners (Attendance in Courts) Act, 1955

**(Act No. 32 of 1955)**

[ *As in force on the 6th August, 2006* ]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००८

[किंमत : रुपये १६.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान असलेला दि प्रिझनर्स (अटेन्डन्स इन कोर्टस) ॲक्ट, १९५५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १५ अंक २, दिनांक ९ नोव्हेंबर २००६ यात पृष्ठ ८८ ते ९१ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

**टी. के. विश्वनाथन,**
सचिव,
भारत सरकार.

नवी दिल्ली,
दिनांक ९ नोव्हेंबर २००६

## PREFACE

This edition of the Prisoners (Attendance in Courts) Act, 1955 as on the 6th August 2006 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 2 Vol. 15, dated 9th November 2006, on pages 88 to 91.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the
Government of India.

New Delhi,
Date 9th November 2006

# कैदी (न्यायालयातील उपस्थिती) अधिनियम, १९५५

## कलमांचा क्रम

**कलमे**

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. साक्ष देण्यासाठी किंवा दोषारोपाला उत्तर देण्यासाठी कैद्यांना उपस्थित राहण्यास फर्मावण्याचा न्यायालयांचा अधिकार.

४. कलम ३ च्या अंमलापासून विवक्षित कारागृहांना सूट देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

५. ज्यांना हजर करावयाचे आहे असे कैदी.

६. कारागृहाचा प्रभारी अधिकारी आदेशाची अंमलबजावणी केव्हा करणार नाही.

७. कैद्यांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे.

८. फौजदारी प्रक्रिया संहिता व दिवाणी प्रक्रिया संहिता यांच्या विवक्षित तरतुदी लागू होणे.

९. नियम करण्याचा अधिकार.

१०. निरसन.

**पहिली अनुसूची**

**दुसरी अनुसूची**

इंग्रजी—मराठी शब्दसूची

मराठी—इंग्रजी शब्दसूची

# कैदी (न्यायालयातील उपस्थिती) अधिनियम, १९५५

## (१९५५ चा अधिनियम क्रमांक ३२)

( ६ ऑगस्ट २००६ रोजी यथाविद्यमान)

[२० सप्टेंबर १९५५]

**कारागृहात बंदिस्त केलेल्या व्यक्तीची साक्ष घेण्यासाठी किंवा गुन्हेगारी आरोपाला उत्तर देण्यासाठी त्यांच्या न्यायालयातील उपस्थितीच्या संबंधात तरतुदी करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय प्रजासत्ताकाच्या सहाव्या वर्षी संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**१.** (१) या अधिनियमास, " कैदी (न्यायालयातील उपस्थिती) अधिनियम, १९५५ " असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

(२) तो, जम्मू व काश्मीर राज्य खेरीज करून संपूर्ण भारतास लागू आहे.

(३) तो, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास* अमलात येईल.

**२.** या अधिनियमात,— **व्याख्या.**

(क) " कारागृहातील बंदिवास " याच्या संदर्भामध्ये-मग तो कोणत्याही शब्दांत व्यक्त केलेला असो-कारागृहातील बंदिवास यामध्ये प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेसाठी तरतूद करणाऱ्या कोणत्याही विधि अन्वये एखाद्या कारागृहात केलेल्या बंदिवासाच्या किंवा स्थानबद्धतेच्या संदर्भाचा समावेश होतो ;

(ख) " कारागृह " यामध्ये—

(एक) राज्य शासनाकडून, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, दुय्यम तुरुंग म्हणून घोषित केलेले कोणतेही ठिकाण ; आणि

(दोन) कोणतेही सुधारालय, बोर्स्टल संस्था किंवा तशा स्वरूपाची अन्य संस्था,

यांचा समावेश होतो ;

[१][(ग) संघराज्यक्षेत्राच्या संबंधात " राज्य शासन " याचा अर्थ, त्या संघराज्यक्षेत्राचा प्रशासक, असा होतो.]

**३.** (१) कोणतेही दिवाणी किंवा फौजदारी न्यायालय, कोणत्याही कारागृहात बंदिस्त असलेल्या कोणत्याही व्यक्तीची साक्ष, त्याच्यासमोर प्रलंबित असलेल्या कोणत्याही प्रकरणात महत्त्वाची आहे असे त्याला वाटत असेल तर, ते न्यायालय कारागृहाच्या प्रभारी अधिकाऱ्याला निदेशित करणारा, पहिल्या अनुसूचीत ठरवून दिलेल्या नमुन्यातील आदेश देऊ शकेल : **साक्ष देण्यासाठी किंवा दोषारोपाला उत्तर देण्यासाठी कैद्यांना उपस्थित राहण्यास फर्मावण्याचा न्यायालयांचा अधिकार.**

परंतु, न्यायालय जेथे भरलेले असेल त्या राज्याबाहेर असलेल्या कारागृहात बंदिस्त असलेल्या व्यक्तीच्या बाबतीत, या पोटकलमान्वये कोणतेही दिवाणी न्यायालय आदेश देणार नाही.

(२) कोणतेही फौजदारी न्यायालय, कोणत्याही कारागृहात बंदिस्त असलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध एखाद्या अपराधाचा आरोप त्याच्यावर केला असल्यास किंवा त्याच्यापुढे प्रलंबित असल्यास, कारागृहाच्या प्रभारी अधिकाऱ्याला निदेशित करणारा, दुसऱ्या अनुसूचीत ठरवून दिलेल्या नमुन्यातील आदेश देऊ शकेल.

(३) जिल्हा न्यायाधीशाला दुय्यम असलेल्या एखाद्या दिवाणी न्यायालयाने, या कलमान्वये दिलेला कोणताही आदेश जिल्हा न्यायाधीशाने प्रतिस्वाक्षरित केल्याशिवाय लागू होणार नाही आणि प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ असलेल्या फौजदारी न्यायालयाने या कलमान्वये दिलेला कोणताही आदेश, ज्याला ते न्यायालय दुय्यम आहे किंवा ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आत ते न्यायालय आहे. त्या जिल्हा दंडाधिकाऱ्याने प्रतिस्वाक्षरित केल्याशिवाय लागू होणार नाही.

(४) पोटकलम (३) च्या प्रयोजनार्थ, इलाखा शहर किंवा हैद्राबाद शहर याच्या बाहेर असलेले लघुवाद न्यायालय, ज्याच्या अधिकारतेच्या स्थानिक सीमांच्या आत असे न्यायालय आहे, त्या जिल्हा न्यायाधीशाला दुय्यम असल्याचे समजले जाईल.

---

* १ जानेवारी १९५६. पहा-अधिसूचना क्रमांक एस. आर. ओ. ३४४७, दिनांक ८ नोव्हेंबर १९५५ **भारताचे राजपत्र**, १९५५, भाग दोन, कलम ३, इंग्रजी पृष्ठ क्रमांक २२२९.

१. विधि अनुकूलन आदेश (क्रमांक ३), १९५६ द्वारे पूर्वीच्या खंडाऐवजी समाविष्ट करण्यात आला.

**कलम ३ च्या अंमलापासून विवक्षित कारागृहांना सूट देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.**

४. (१) पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबी लक्षात घेऊन, राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे असे निदेशित करू शकेल की, कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तींचा वर्ग ज्या कारागृहात बंदिस्त केला जाईल त्या कारागृहातून तिला किंवा त्यांना हलविण्यात येऊ नये आणि त्यानंतर, असा आदेश, जोपर्यंत अंमलात असेल तोपर्यंत अशा व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला, कलम ३ च्या तरतुदी लागू होणार नाहीत.

(२) पोटकलम (१) अन्वये आदेश काढण्यापूर्वी, राज्य शासन खालील बाबी विचारात घेईल, त्या अशा :—

(क) ज्यासाठी किंवा ज्याच्या आधारे एखादी व्यक्ती किंवा व्यक्तींचा वर्ग यांना बंदिवासात ठेवण्याचा आदेश देण्यात आला आहे त्या अपराधाचे स्वरूप किंवा त्याची कारणे ;

(ख) एखाद्या व्यक्तीस किंवा व्यक्तींच्या वर्गास एखाद्या कारागृहातून हलविण्यास परवानगी दिली तर, सार्वजनिक सुव्यवस्थेला बाध येण्याची शक्यता ;

(ग) सर्वसाधारणपणे सार्वजनिक हित.

**ज्यांना हजर करावयाचे आहे असे कैदी.**

५. कलम ३ अन्वये काढलेला कोणताही आदेश, त्यात नाव असलेली व्यक्ती ज्या कारागृहात बंदिस्त करण्यात आली आहे त्या कारागृहाच्या प्रभारी अधिकाऱ्याला दिल्यानंतर, तो अधिकारी, त्या व्यक्तीला न्यायालयात उपस्थित करावयासाठी त्या आदेशात नमूद केलेल्या वेळी, ज्या न्यायालयात तिची उपस्थिती आवश्यक आहे त्या न्यायालयात तिला नेण्याची व्यवस्था करील आणि तिची तपासणी होईपर्यंत किंवा न्यायालयाचा न्यायाधीश किंवा पीठासीन अधिकारी, कैद्याला तो ज्या कारागृहात बंदिस्त होता त्या कारागृहात परत नेण्यास, त्याला प्राधिकृत करेपर्यंत त्याला न्यायालयातील किंवा न्यायालयाच्या जवळच्या अभिरक्षेत स्थानबद्ध करण्याची व्यवस्था करील.

**कारागृहाचा प्रभारी अधिकारी आदेशाची अंमलबजावणी केव्हा करणार नाही.**

६. जिच्या संबंधी कलम ३ अन्वये आदेश देण्यात आला आहे ती व्यक्ती,—

(क) ज्या कारागृहात बंदिस्त करण्यात आली आहे तेथून हलविण्यास, आजाराच्या किंवा इतर दुर्बलतेच्या कारणामुळे त्याबाबतीत केलेल्या नियमांनुसार असमर्थ घोषित करण्यात आली असेल ; किंवा

(ख) न्यायचौकशीसाठी सुपूर्द करण्यात आली असेल ; किंवा

(ग) न्यायचौकशी पूर्ण होईपर्यंत किंवा प्रारंभिक अन्वेषण पूर्ण होईपर्यंत कारागृहात परत पाठविण्यात आली असेल ; किंवा

(घ) या अधिनियमान्वये तिला हलविण्यासाठी व ती ज्या कारागृहात बंदिस्त आहे तेथे तिला परत नेण्यासाठी आवश्यक असलेला कालावधी संपण्यापूर्वीच ज्या अभिरक्षेचा कालावधी संपत असेल, अशा अभिरक्षेत असल्यास ;

कारागृहाचा प्रभारी अधिकारी अशा आदेशाची अंमलबजावणी करणार नाही व अशी अंमलबजावणी न केल्याबद्दलच्या कारणांचे निवेदन, ज्या न्यायालयाकडून असा आदेश काढण्यात आला होता त्या न्यायालयाकडे पाठवील ;

परंतु,—

(एक) जर तो आदेश एखाद्या फौजदारी न्यायालयाने काढला असेल तर ;

आणि

(दोन) त्या आदेशात नाव असलेली व्यक्ती न्यायचौकशीसाठी सुपूर्द करण्याकरिता किंवा जिची न्यायचौकशी होईपर्यंत किंवा प्रारंभिक अन्वेषण होईपर्यंत तिला बंदिस्त करण्यात आले असेल आणि आजार किंवा इतर दुर्बलतेच्या कारणामुळे ज्या कारागृहात ती बंदिस्त करण्यात आली आहे तेथून हलविण्यास ती असमर्थ आहे असे याबाबतीत केलेल्या नियमानुसार घोषित करण्यात आले नसेल तर, आणि

(तीन) त्या आदेशात नाव असलेल्या व्यक्तीची साक्ष ज्या ठिकाणी आवश्यक आहे ते ठिकाण, तिला जिथे बंदिस्त करण्यात आले आहे त्या कारागृहापासून पाच मैलांपेक्षा जास्त अंतरावर नसेल तर,

वर उल्लेखिलेला असा अधिकारी त्या आदेशाची अंमलबजावणी करील.

**कैद्यांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे.**

७. खालीलपैकी कोणत्याही बाबतीत,—

(क) कोणत्याही दिवाणी न्यायालयाला, एखाद्या कारागृहात बंदिस्त असलेल्या एखाद्या व्यक्तीची साक्ष, त्याच्यासमोर प्रलंबित असलेल्या कोणत्याही प्रकरणामध्ये महत्त्वाची आहे असे वाटत असेल आणि कलम ६ च्या तरतुदींच्या कारणामुळे किंवा कलम ४ अन्वये काढलेल्या आदेशामुळे किंवा जिल्हा न्यायाधीशाने (कैद्यास) हलवण्याच्या आदेशावर, कलम ३ च्या पोटकलम (३) अन्वये, प्रतिस्वाक्षरी करण्यास नकार दिल्यामुळे अशा व्यक्तीला न्यायालयात उपस्थित करणे शक्य होत नसल्यास ; किंवा

(ख) वर सांगितल्याप्रमाणे कोणत्याही दिवाणी न्यायालयाला, जेथे असे न्यायालय भरले असेल त्या राज्याच्या बाहेर असलेल्या किंवा असे न्यायालय जेथे भरले आहे त्या ठिकाणापासून पन्नास मैलांपेक्षा जास्त अंतरावर असलेल्या कारागृहात बंदिस्त असलेल्या एखाद्या व्यक्तीची साक्ष अशा कोणत्याही प्रकरणामध्ये महत्त्वाची आहे असे वाटत असल्यास तेथे,

जर न्यायालयाला योग्य वाटत असेल तर, न्यायालय, ती व्यक्ती ज्या कारागृहात, बंदिस्त आहे त्या कारागृहात त्या व्यक्तीची तपासणी करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) तरतुदींअन्वये आयोगपत्र काढू शकेल.

**फौजदारी प्रक्रिया संहिता व दिवाणी प्रक्रिया संहिता यांच्या विवक्षित तरतुदी लागू होणे.**

८. या अधिनियमात आणि त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियमांमध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५), व यथास्थिति, फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा ५) यांच्या तरतुदी, ज्याप्रकारे इतर कोणत्याही व्यक्तीची आयोगपत्राद्वारे तपासणी करण्यासंबंधात जशा लागू होतात त्याच प्रकारे एखाद्या कारागृहात बंदिस्त असलेल्या कोणत्याही व्यक्तीची आयोगपत्राद्वारे किंवा अन्यथा तपासणी करण्याच्या बाबतीत, शक्य तेथवर, लागू होतील.

**नियम करण्याचा अधिकार.**

९. (१) राज्य शासनाला या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषत: आणि पुर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता, अशा नियमांमध्ये खालील बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) कलम ३ अन्वये काढलेल्या आदेशावर प्रतिस्वाक्षरी घेण्यासंबंधीची कार्यपद्धती ;

(ख) कारागृहात बंदिस्त असलेली एखादी व्यक्ती तेथून हलवली जाण्यास असमर्थ आहे, अशी घोषणा ज्याच्याद्वारे केली जाऊ शकेल असा प्राधिकारी आणि ज्या रीतीने केली जाऊ शकेल ती रीत ;

(ग) खर्चाच्या व आकाराच्या प्रदानासंबंधीच्या शर्तीसहित, ज्या शर्तीच्या अधीन राहून, दिवाणी न्यायालयाने कलम ३ अन्वये काढलेल्या आदेशाची अंमलबजावणी करता येईल त्या शर्ती ;

(घ) एखाद्या कारागृहात बंदिस्त असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या नावे कोणत्याही न्यायालयाने निर्देशित केलेली आदेशिका, तिच्यावर बजावण्याची रीत ;

(ङ) एखाद्या कारागृहात बंदिस्त असलेल्या व्यक्तीची उपस्थिती ज्या न्यायालयांमध्ये आवश्यक आहे त्या न्यायालयापर्यंत व तेथपासून आणि अशा उपस्थितीच्या कालावधीमध्ये त्यांच्या अभिरक्षेसाठी असलेला संरक्षक ;

(च) अशा संरक्षकाचा खर्च आणि आकार यांसाठी मान्य करावयाची रक्कम ; आणि

(छ) या अधिनियमाच्या अंमलबजावणीशी संबंधित इतर सर्व बाबींसंबंधात अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन.

**निरसन.**

१०. (१) कैदी अधिनियम, १९०० (१९०० चा ३) चा भाग नऊ व उक्त अधिनियमाची पहिली व दुसरी अनुसूची याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) जर या अधिनियमाच्या प्रारंभीच्या लगतपूर्वी, या अधिनियमाच्या तरतुदींशी समनुरूप असलेला कोणताही विधि, या अधिनियमाचा, ज्यावर विस्तार आहे अशा कोणत्याही भाग ख राज्यामध्ये अंमलात असेल तर, ज्या बाबींसंबंधात या अधिनियमाद्वारे कार्यवाही केली जाते अशा बाबींचा, जेथवर संबंध आहे तेथवर, असा विधि अशा प्रारंभापासून निरसित होईल :

परंतु, अशा कोणत्याही विधिअन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा त्याअन्वये केलेली कोणतीही कारवाई जोपर्यंत या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा केलेल्या कोणत्याही कारवाईमुळे अधिक्रमित होत नाही तोपर्यंत, ती या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये केली आहे असे समजण्यात येईल व त्यानुसार त्या अंमलात राहतील.

## पहिली अनुसूची

[कलम ३ चे पोटकलम (१) पहा]

............................ यांचे न्यायालय

प्रति

प्रभारी अधिकारी ............................

(कारागृहाचे नाव लिहावे.)

याद्वारे, आपणास असे फर्मावण्यात येत आहे की, सध्या ............................ मध्ये बंदिस्त असलेला ............................ याला ............................ च्या ............................ दिवशी ............ येथील ...................... यांच्या न्यायालयात त्याच दिवशी मध्यान्हपूर्व ................... वाजता, सध्या उक्त न्यायालयासमोर प्रलंबित असलेल्या प्रकरणामध्ये साक्ष देण्यासाठी सुरक्षितपणे व निश्चितपणे हजर करावे आणि उक्त व्यक्तीने तेथल्या तेथे, उक्त न्यायालयासमोर तिची साक्ष दिल्यावर किंवा उक्त न्यायालयाने तिची पुढील उपस्थिती आवश्यक नसल्याचे सांगितल्यावर सुरक्षितपणे व निश्चितपणे तिला कारागृहात परत नेण्याची व्यवस्था करावी.

दिनांक .................. माहे ............

(प्रतिस्वाक्षरी) (अ.ब.) (क.ड.)

## दुसरी अनुसूची

[कलम ३ चे पोटकलम (२) पहा]

............................ यांचे न्यायालय

प्रति

प्रभारी अधिकारी ............................

(कारागृहाचे नाव लिहावे.)

याद्वारे, आपणास असे फर्मावण्यात येत आहे की, सध्या ............................ मध्ये बंदिस्त असलेला ............................ याला ............................ च्या ............................ दिवशी ............ येथील ...................... यांच्या न्यायालयात त्याच दिवशी मध्यान्हपूर्व ................... वाजता, सध्या उक्त न्यायालयासमोर प्रलंबित असलेल्या दोषारोपाला उत्तर देण्यासाठी सुरक्षितपणे व निश्चितपणे हजर करावे आणि असा दोषरोप निकालात काढल्यांनतर किंवा उक्त न्यायालयाने त्याची पुढील उपस्थिती आवश्यक नसल्याचे सांगितल्यावर सुरक्षितपणे व निश्चितपणे त्याला उक्त कारागृहात परत नेण्याची व्यवस्था करावी.

दिनांक .................. माहे ............

(प्रतिस्वाक्षरी) (अ.ब.) (क.ड.)

# THE PRISONERS (ATTENDANCE IN COURTS) ACT, 1955

## कैदी (न्यायालयातील उपस्थिती) अधिनियम, १९५५

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| Administrator | प्रशासक | [Sec. 2 (c)] |
| commissions | आयोगपत्र | [Sec. 7 (m.n.)] |
| charge | दोषारोप | [Sec. 3 (m.n.)] |
| confined | बंदिस्त | [Sec. 3 (1)] |
| confinement in a prison | कारागृहातील बंदिवास | [Sec. 2 (a)] |
| corresponding | समनुरूप | [Sec. 10 (2)] |
| countersign | प्रतिस्वाक्षरित करणे | [Sec. 3 (3)] |
| evidence | साक्ष | [Sec. 3 (1)] |
| local limit | स्थानिक सीमा | [Sec. 3 (4)] |
| presidency town | इलाखा शहर | [Sec. 3 (4)] |
| preventive detention | प्रतिबंधात्मक स्थानबद्धता | [Sec. 2 (a)] |
| process | आदेशिका | [Sec. 9(2) (d)] |
| reformatory | सुधारालय | [Sec. 2 (b) (2)] |
| subsidiary jail | दुय्यम तुरुंग | [Sec. 2 (b)(1)] |
| supersede | अधिक्रमित होणे | [Sec. 10 (2)] |

# कैदी (न्यायालयातील उपस्थिती) अधिनियम, १९५५

# THE PRISONERS (ATTENDANCE IN COURTS) ACT, 1955

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिक्रमित होणे | supersede | [कलम १० (२)] |
| आदेशिका | process | [कलम ९(२) (घ)] |
| आयोगपत्र | commission | [कलम ७ (समासटीप)] |
| इलाखा शहर | presidency town | [कलम ३ (४)] |
| कारागृहातील बंदिवास | confinement in a prison | [कलम २ (क)] |
| दुय्यम तुरूंग | subsidiary in Jail | [कलम २ (ख)(एक)] |
| दोषारोप | charge | [कलम ३ (समासटीप)] |
| प्रतिबंधात्मक स्थानबद्धता | preventive detention | [कलम २ (क)] |
| प्रतिस्वाक्षरित करणे | countersign | [कलम ३ (३)] |
| प्रशासक | administrator | [कलम २ (ग)] |
| बंदिस्त | confined | [कलम ३ (१)] |
| समनरूप | corresponding | [कलम १० (२)] |
| साक्ष | evidence | [कलम ३ (१)] |
| सुधारालय | reformatory | [कलम २ (ख) (दोन)] |
| स्थानिक सीमा | local limit | [कलम ३ (४)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई